action edn92


# महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,

MCAER कृषि परिषद

आयएसओ ९००१ : २००८ मानांकित संस्था

१३२/ब, भांबुर्डा, भोसलेनगर, पुणे - ४११ ००७.

MCAER कृषि परिषद २००८-२००९

ई-मेल : edn_mcaer@rediffmail.com दूरध्वनी : (०२०) २५५३ ७६८८.

वेबसाईट : www.mcaer.org फॅक्स : (०२०) २५५३ ३७६४.


जलद टपालाने

जा.क्र. मकृप/शिक्षण/९१६/ ११८० दि२० मे,२०१६

## परिपत्रक

**विषय:- कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील महाविद्यालयांकडून मागविण्यात आलेली अनामत रक्कम व माहिती कृषी परिषद कार्यालयास सादर करणेबाबत.**

संदर्भ:- १. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/प्र.क्र.९१६/५६८, दि.१८/३/२०१६
२. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप / शिक्षण-१ / प्र.क्र. १६१६ / ८५९ दि.२१/४/२०१६
३. या कार्यालयाचे परिपत्रक जा.क्र. मकृप/शिक्षण/प्र.क्र.९१६/१०८०, दि.९/५/२०१६
४. या कार्यालयाचे पत्र जा.क्र. मकृप / शिक्षण-१ / प्र.क्र.१६१६ / ८८९ / २०१६ दि.२२/४/२०१६

कृषी परिषद कार्यालयाच्या संदर्भ क्र. १ येथील दि. १८/३/२०१६ च्या परिपत्रकान्वये सध्या अस्तित्वात असलेल्या १५६ कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील महाविद्यालयांना रू.२०.०० लाख अनामत रकमेची बाब लागू करण्यात आली आहे. यापूर्वी विना अनुदानित महाविद्यालयांकडून संबंधित कृषी विद्यापीठांकडे किंवा कृषी परिषदेकडे जमा असलेली अनामत रक्कम वगळता उर्वरित रक्कम सर्व विना अनुदानित महाविद्यालयांनी दि. ५/५/२०१६ पर्यंत कृषी परिषद कार्यालयाकडे जमा करण्याचे सूचित करण्यात आले होते. तथापि, विविध महाविद्यालयांकडून मुदत देण्याविषयीची विनंती विचारात घेता, रू.२०.०० लाख अनामत रक्कम एकरकमी कृषी परिषदेकडे न भरता टप्प्याटप्प्याने भरण्याची सवलत या कार्यालयाच्या संदर्भ क्र. ३ येथील दि.९/५/२०१६ च्या परिपत्रकान्वये देण्यात आली आहे.

या कार्यालयाच्या संदर्भ क्र. २ येथील परिपत्रकान्वये प्रत्येक शैक्षणिक वर्ष सुरु होण्यापूर्वी ७/१२ उताऱ्यांची प्रत या कार्यालयाकडे सादर करण्याचे सूचित करण्यात आलेले आहे. दि. १ मार्च पासून पुढील दिनांकास निर्गमित केलेल्या ७/१२ उताऱ्याची प्रत नवीन वर्षाकरिता ग्राह्य धरण्यात येणार आहे. विना अनुदानित महाविद्यालयांकडील शैक्षणिक कर्मचाऱ्यांच्या नियुक्त्यांसंदर्भात माहिती जतन करण्याविषयीही सदर परिपत्रकामध्ये सूचना देण्यात आलेल्या आहेत.

संदर्भ क्र. ४ येथील पत्रान्वये सर्व विना अनुदानित महाविद्यालयांनी मागील पाच वर्षाचे लेखा परीक्षण अहवाल कृषी परिषद कार्यालयास सादर करण्याचे सूचित करण्यात आलेले आहे.

वरीलप्रमाणे वेळोवेळी परिपत्रके निर्गमित करून त्याप्रमाणे या कार्यालयास माहिती व आवश्यक ती रक्कम जमा करण्याचे सूचित करण्यात आलेले असतांना बहुतांश महाविद्यालयांकडून अद्यापपर्यंत याबाबतच्या पूर्तता करण्यात आलेल्या नाहीत.

उक्त बाबीचे गांभीर्य लक्षात घेता, राज्यातील चारही कृषी विद्यापीठांतर्गत कायमस्वरूपी विना अनुदानित तत्वावरील सर्व महाविद्यालयांना याद्वारे सूचित करण्यात येते की, **७/१२ उतारे, मागील पाच वर्षांचे लेखा परीक्षण अहवाल, उपलब्ध कर्मचारी (त्यांच्या शैक्षणिक पात्रतेसह), त्यांना देण्यात**

action edn92

येत असलेले वेतन व त्यांच्या नियुक्त्यांबाबत तपशील (जसे संबंधित कृषी विद्यापीठाच्या मान्यतेने केलेल्या नियुक्त्या) इत्यादी माहिती मे,२०१६ अखेर कृषी परिषद कार्यालयास खास दूताकरवी सादर करावी.

मे,२०१६ अखेर प्रत्येक विना अनुदानित महाविद्यालयाने रू.५.०० लाख अनामत रक्कम कृषी परिषद कार्यालयाकडे भरण्याच्या सूचना यापूर्वीच देण्यात आलेल्या आहेत. यानंतर उर्वरित रक्कम दोन टप्प्यात भरण्याचे कळविण्यात आले होते. सदरचे परिपत्रक रद्द करण्यात येत असून ज्या महाविद्यालयांची सांपत्तिक स्थिती चांगली आहे, अशा महाविद्यालयांना टप्प्याटप्प्यामध्ये रक्कम भरण्याची सवलत देण्यात येणार नाही. त्यांनी रू.२०.०० लाख एकरकमी कृषी परिषद कार्यालयाकडे जमा करावेत, असेही हया परिपत्रकाद्वारे सूचित करण्यात येते. उर्वरित महाविद्यालयांनी या कार्यालयाच्या संदर्भ क्र.२ येथील परिपत्रकानुसार आणि संदर्भ क्र.४ येथील पत्राप्रमाणे प्रस्ताव कृषी परिषदेस सादर करावेत.

मे,२०१६ अखेर कृषी परिषदेकडे रक्कम जमा करणे आणि वरील माहिती कृषी परिषद कार्यालयाकडे सादर करणे या दोन्ही बाबींची पूर्तता न केल्यास संबंधित विना अनुदानित महाविद्यालयाची प्रवेश प्रक्रिया स्थगित करण्यात येईल व प्रवेश माहिती पुस्तिकेतून अशा महाविद्यालयांची नावे वगळण्यात येतील व त्यासाठी त्या संस्था / महाविद्यालये स्वतः जबाबदार राहतील, याची कायमस्वरूपी विना अनुदान तत्वावरील प्रत्येक महाविद्यालयांनी नोंद घ्यावी.

महासंचालक
महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद,पुणे

प्रति,

प्राचार्य, सर्व कृषी विद्यापीठांतर्गत कायमस्वरूपी विना अनुदानित तत्वावरील सर्व महाविद्यालये.

प्रतः-

१. मा. मंत्री (कृषी) तथा अध्यक्ष, कृषी परिषद यांचे विशेष कार्य अधिकारी, मा.मंत्री (कृषी) यांचे कार्यालय, मंत्रालय, मुंबई-३२.

२. मा. उपाध्यक्ष यांचे स्वीय सहायक, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे

३. वित्तीय सल्लागार, महाराष्ट्र कृषी शिक्षण व संशोधन परिषद, पुणे

४. मे. जे. डी. आय. एन. सॉफ्ट, आरएच-७, प्लॉट क्र. ६१, सेक्टर क्र. १६, पीसीएनटीडीए, चिखली, पुणे ४११ ०१९.

यांना सूचित करण्यात येते की, त्यांनी सदरचे परिपत्रक कृषी परिषदेच्या संकेतस्थळावर प्रसिध्द करावे.

५. कुलसचिव / नियंत्रक, महात्मा फुले कृषी विद्यापीठ,राहुरी, जि.अहमदनगर / कुलसचिव / नियंत्रक, डॉ. पंजाबराव देशमुख कृषी विद्यापीठ, अकोला / कुलसचिव / नियंत्रक, वसंतराव नाईक मराठवाडा कृषी विद्यापीठ, परभणी / कुलसचिव / नियंत्रक, डॉ.बाळासाहेब सावंत कोंकण कृषी विद्यापीठ, दापोली जि.रत्नागिरी

६. निवड नस्ती.